# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

**CB/17/2026**

# प्रेसनोट

गुन्हे शाखा, नवी मुंबई | दिनांक 13/03/2026

**'' २४ तासाचे आत घरफोडीचे ०३ आरोपी अटक करून गुन्हे शाखेने ३६ लाख किंमतीचे दागिने केले हस्तगत ''**

पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री.मिलिंद भारंबे, पोलीस सह. आयुक्त, श्री.संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, श्री.सचिन गुंजाळ यांनी घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणणेबाबत सुचना दिलेल्या होत्या.

फिर्यादी श्रीमती रूबी संतोष पात्रो, वय ४९ वर्षे, व्यवसाय—नोकरी, राह. रुम नं. २०३, पृथ्वी बिल्डींग, सेक्टर नं.१६, प्लॉट नं.०९, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड यांचे राहते घरी दिनांक ०९/०३/२०२६ रोजी १६.३०वा. ते १८:००वा.च्या दरम्यान अज्ञात चोरटयांनी घराच्या मुख्य लाकडी दरवाज्याचे लॅच तोडून सुमारे ३० तोळे वजनाचे सोने—चांदीचे दागिने तसेच रोख रक्कम असा एकूण ३६,००,०००/— रूपये किंमतीचा मुद्देमाल घरफोडी चोरी केल्याने कळंबोली पोलीस ठाणे गु.र.नं.७१/२०२६, बी.एन.एस.कलम ३३१(३), ३०५ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

नमुद गुन्हयाचे घटनास्थळी गुन्हे शाखा कक्ष २ चे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ भेट देवुन गुप्त बातमीदार व तांत्रिक तपासावरून दिनांक १०/०३/२०२६ रोजी आरोपी **१) पवन रोहिदास जाधव, वय २५ वर्षे, राह. मंगळया हरी चाळ, चाळ नं.६, रूम नं.३, दत्त मंदिराजवळ, डायघर गाव, ता.कल्याण, जि.ठाणे, २) सुमित रोहिदास जाधव, वय २२ वर्षे, राह. संतोष चाळ, चाळ नं.६, रूम नं.११, पडले गाव, सरस्वती मराठी शाळेच्या पाठीमागे, ता.कल्याण जि.ठाणे व ३) शिवाजी जगन राठोड, वय २३ वर्षे, राह. साईसृष्ठी, चाळ नं.३, रूम नं.३, पडले गाव, ता. कल्याण, जि.ठाणे** यांना डायघर गांव येथे सापळा रचून शिताफीने ताब्यात घेवून अटक केले. गुन्हयाचे तपासादरम्यान अटक आरोपीकडुन गुन्हयात चोरीस गेलेले **सुमारे ३० ग्रॅम वजनाचे ३६ लाख किंमतीचे सोने—चांदीचे दागिने हस्तगत करण्यात आलेले आहेत**. अटक आरोपींना दिनांक १३/०३/२०२६ रोजी पर्यत पोलीस कोठडी मिळालेली आहे.

सदरची उल्लेखनीय कामगिरी सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, नवी मुंबई, श्रीमती प्रेरणा कट्टे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष २ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अनिल पाटील, सपोनि/एकनाथ देसाई, पोउपनि/संजय पवार, पोउपनि/अभिजीत देशमुख, पोहवा/दुधाळ, पोहवा/जोशी, पोहवा/जेजुरकर, पोहवा/पांचाळ, पोहवा/सावंत, पोहवा/राउत, पोहवा/पाटील, पोहवा/धनवटे, पोहवा/कोपरकर, पोना/मोरे, पोना/गायकवाड, चापोना/कोळी, पोशि/तांदळे व चापोना/सोनवलकर यांनी केली आहे.

...................